क.एन/६४२ /२०२५
दि.१२.०६.२०२५

**-: जाहिर नोटीस :-**

जिल्हा न्यायालय सोलापूर व त्या अधिनस्त येणा-या स्थानिक न्यायालयातील नियमानुसार नाश करण्यात आलेल्या अभिलेखाची (रेकॉर्ड) नवीन व जुनी रद्दी तसेच, न्यायालयांकरिता खरेदी करण्यात आलेल्या कुलर्स, संगणक, प्रिंटर इत्यांदींचे बॉक्स विक्री करणेचे आहे. त्याकरिता या जाहिर नोटीसीद्वारे रद्दी खरेदीदाराकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**-: नियम व अटी :-**

१. सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दि१९.०६.२०२५ पर्यंत जिल्हा न्यायालय सोलापूर येथे **मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश सोलापूर** यांच्या नावाने बंद लखोटयात दरपत्रक सादर करावे. लखोटयावर **''रद्दी खरेदी बाबत दरपत्रक''** असे नमुद करण्यात यावे.

२ मुदती नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

३ **रद्दीचा दर खालीलप्रमाणे नमूद करावा. इतर प्रकारे दर नमूद केल्यास दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही व त्यास निविदाकार जबाबदार राहतील. तसेच त्याबाबत नंतर कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.**

| अ.क्र. | रद्दी तपशील | प्रति किलो दर रू. |
|---|---|---|
| १. | नवीन कागदपत्रांची रद्दी | |
| २. | जुन्या कागदपत्रांची रद्दी | |
| ३. | संगणक व इतर साहित्यांचे रिकामे बॉक्स | |

४ रद्दी या कार्यालयाकडून वेळोवेळी देण्यात येणा-या सुचनेनुसार प्रत्यक्ष जागेवर जाऊन, आहे त्या स्थितीमध्ये इलेक्ट्रॉनिक वजन काटयाद्वारे वजन करुन, संबंधीत कार्यालयात त्याची होणारी रक्कम रोख स्वरुपात जमा केल्यानंतरच रद्दी ताब्यात घ्यावयाची आहे.

५ त्यासाठी लागणारे बारदाना, रद्दी खरेदीदाराने आणावयाचा आहे. तसेच, वाहतुक खर्चही त्यांनीच करावयाचा आहे.

६ दरपत्रके ही कार्यालयीन वेळी (सकाळी १०.३० ते सायं. ५.००) सुटीचे दिवस सोडून **''बंद लखोटयात''** आणुन दयावीत.

७ रद्दीचे कोणतेही दरपत्रक मंजुर करण्याचा अगर कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार ''मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश सोलापूर'' यांनी स्वत: कडे राखून ठेवला आहे.

आदेशावरुन,

सहा. अधिक्षक

प्र. प्रबंधक
जिल्हा न्यायालय, सोलापूर

DISTRICT COURT OF SHOLAPUR
सत्यमेव जयते
डिस्ट्रिक्ट कोर्ट सोलापूर

प्रत.

१. जिल्हा न्यायालय, सोलापूर अधिकृत संकेतस्थळ

२. जिल्हा न्यायालय, सोलापूर नोटीस बोर्ड